# करिअर संसद शपथविधी सोहळा २०२५-२०२६

## दिनांक: १५ जुलै २०२५

## स्थळ: डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रज्ञान शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या "करिअर कट्टा" या उपक्रमांतर्गत, करिअर संसद २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षातील नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा आज डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर येथे उत्साही आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

या सोहळ्यात मुख्यमंत्री, तसेच सर्व माननीय मंत्र्यांनी विधीपूर्वक शपथ घेऊन आपल्या पदाची जबाबदारी स्वीकारली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दीपा पान्हेकर मॅडम होत्या. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. विठ्ठल बोंदर सर आणि डॉ. विद्या चौरपगार मॅडम यांनी यशस्वी समन्वय साधला.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून माजी मुख्यमंत्री आदरणीय अभिषेक भूते तसेच जिल्हा नियोजन समिती सदस्य हर्ष गणवीर व संपूर्ण माजी करियर संसद यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांना नवचैतन्य मिळाले.या सोहळ्यात सर्व पदाधिकाऱ्यांना डायऱ्या व लेबेल्सचे वितरण करण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रम करिअर संसद विभागाच्या सहकार्याने अत्यंत यशस्वीपणे पार पडला.




करिअर संसद


करिअर संसद


करिअर संसद





# डॉ. आंबेडकर कॉलेजमध्ये करिअर संसद शपथविधी सोहळा

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवकांसाठी प्रेरणास्थान असल्याचे मत प्राचार्य डॉ. दीपा पान्हेकर यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र व माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत मंगळवारी (15 जुलै) जागतिक युवा कौशल्य दिनाच्या निमिताने करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा महाविद्यालयाच्या दादासाहेब कुंभारे सभागृहात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दीपा पान्हेकर उपस्थित होत्या. डॉ. दीपा पान्हेकर यांनी पदाधिकाऱ्यांना मंत्रीपदाची शपथ दिली. करिअर संसद शपथविधी सोहळ्यात मुख्यमंत्री - रेवती मनोहर सातोकर, नियोजन मंत्री - अतुल दिनेश चौधरी, कायदे व शिस्तपालन मंत्री - श्रृती शैलेंद्र ओझा, सामान्य प्रशासन मंत्री - उर्वशी मनोहर चौधरी, माहिती व प्रसारण मंत्री - सागर विलास वानखेडे, उद्योजकता विकास मंत्री - गुरु ताराचंद येळणे, रोजगार स्वयंरोजगार मंत्री - यज्ञेश जयंत भाकरे, कौशल्य विकास मंत्री-ओम नितीन सोनवणे, संसदीय कामकाज मंत्री - समीक्षा धनराज रंगारी, महिला व बालकल्याण मंत्री - आचल राजकुमार नाईक, सदस्य - तराना उमेश सुखदेवे, सदस्य - स्वेजल गोविंदा उके, सदस्य - हर्षद लतेश बहेकार या पदाधिकाऱ्यांना शपथ देऊन करिअर कट्ट्याकडून प्रमाणपत्र, करिअर कट्टा डायरी व नियुक्तीपत्र प्राचार्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी डॉ. दीपा पान्हेकर यांनी नवनियुक्त संसदेचे अभिनंदन केले व माजी करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांना कॉलेजमध्ये वर्षभर करिअर कट्टाचे कार्यक्रम यशस्वीपणे राबविल्याबद्दल धन्यवाद दिले. तसेच सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत विपरीत परिस्थितीत शिक्षण घेतले. देशाचे पहिले कायदेमंत्री, मजूर मंत्री होण्याचा बहुमान मिळविला व जगातील उत्कृष्ट असे संविधान भारताला दिले. करिअर संसदेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी आपली भूमिका चोखपणे सांभाळावी, नेतृत्व गुणांचा विकास करावा व स्वतःसोबतच महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावा असे मार्गदर्शन केले. या समारंभासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. माजी करिअर संसद प्रतिनिधी अभिषेक भुते, अंश भुते, लिंटा टॉमसन, तनुश्री चौरपगार, हर्ष गणवीर, अवनी बनकर, प्रशिक बारसागडे, धनश्री चोपडे, छाया धोंगडे, निकिता मेश्राम यांना निरोप देखील देण्यात आला. या उपक्रमास परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भन्ते नागार्जुन सुरई ससाई, सचिव सुधीर फुलझेले व मान्यवर सदस्यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन करिअर कट्टा समन्वयक प्रा. विठ्ठल बोंदर यांनी केले व आभार डॉ. विद्या चौरपगार यांनी मानले.